खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

### हुतात्मा राजगुरू– शहीद दिन

लोकमत

## तरुण पिढीने क्रांतिकारकांच्या देशभक्तीपासून प्रेरणा घ्यावी

### आढळराव पाटील : हुतात्मा दिनानिमित्त राजगुरूनगरमध्ये भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : भगतसिंग सुखदेव राजगुरूसारखे तरुण आपल्या देशाचे गर्व, अहंकार आणि अभिमान असायला हवेत. राजकारणात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांनी भगतसिंगांचे चरित्र जरूर वाचावे व त्यांच्यासारख्या समर्पित भावनेने राजकारणात यावे, असे प्रतिपादन माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केले.

शहिद दिनानिमित्त भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रगण्य क्रांतिवीर हुतात्मा शिवराम हरी राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांच्या ९१ व्या स्मृतिदिनानिमित्त राजगुरूनगर येथे अभिवादन कार्यक्रम झाला. राजगुरूनगर एसटी स्थानक आवारातील हुतात्मा राजगुरू, भगतसिंग व सुखदेव यांच्या स्मृती शिल्पांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अध्यक्ष विजय कोलते, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजय डोळस, शिवसेना नेते अशोक खांडेभराड, पंचायत समितीचे माजी सभापती भगवान पोखरकर, राजेंद्र वाळुंज, जिल्हा दूध संघाचे संचालक अरुण चांभारे, हिरामण सातकर, मुकुंद आवटे, राजगुरू प्रतिष्ठानचे अध्यक्ष कोंडीभाऊ टाकळकर, सुदाम कराळे उपस्थित होते. हुतात्मा राजगुरू यांचे जन्मस्थान असलेल्या राजगुरू वाड्यावर अभिवादन कार्यक्रम झाला. उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या हस्ते वाड्यावर ध्वजारोहण झाले. यावेळी तहसीलदार वैशाली वाघमारे, स्मारक समितीचे अध्यक्ष अतुल देशमुख, सुशील मांजरे, विश्वनाथ गोसावी, विठ्ठल पाचारणे यावेळी उपस्थित होते.



हुतात्मा राजगुरु यांच्या स्मृती शिल्पाना पुष्पहार अर्पण करताना माजी खासदा शिवाजी आढळराव पाटील व मान्यवर.

Hello Pune Gramin
Page No. 8 Mar 24, 2022
Powered by: erelego.com




महाविद्यालयात हुतात्मा राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांच्या प्रतिमेला अभिवादन करतना संस्थाअध्यक्ष मा. देवेंद्रजी बुट्टेपाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय शिंदे व इतर प्राध्यापक



हुतात्मा राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना माजी खासदार मा. शिवाजीराव आढळराव पाटील, संस्थाअध्यक्ष मा. देवेंद्रजी बुट्टेपाटील व इतर मान्यवर



हुतात्मा राजगुरू यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना संस्थाअध्यक्ष मा. देवेंद्रजी बुट्टेपाटील,
संचालक मा. हिरामण सातकर पाटील



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना माजी खासदार मा शिवाजीराव आढळराव पाटील, मा. विजय कोलते, संस्थाअध्यक्ष मा. देवेंद्रजी बुट्टेपाटील, संचालक मा. हिरामण सातकर पाटील व इतर मान्यवर

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख